RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ८, अंक ६५(२)] शुक्रवार, मे २०, २०२२/वैशाख ३०, शके १९४४ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १७४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० मे २०२२

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक सीएलआर-०३२२/प्र.क्र. ६१/राउशु-३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मध्ये, आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणण्यात यावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, (१९४९ चा मुंबई २५ वा) मधील कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकाद्वारे तरतूद केल्याप्रमाणे पूर्व प्रसिद्धीशिवाय हे नियम करण्यात यावेत, असे महाराष्ट्र शासनास वाटते ;

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमामधील कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ज१) च्या उप-खंड (४) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत महाराष्ट्र शासनास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ यात सुधारणा करण्यासाठी पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांना “ महाराष्ट्र देशी मद्य (दुसरी सुधारणा) नियम, २०२२ ” असे संबोधण्यात यावे.

२. महाराष्ट्र देशी मद्य नियम, १९७३ मधील नियम ३५ च्या उप-नियम (१) ऐवजी खालील उप नियमाचा अंतर्भाव करण्यात यावा.

“ (१) नमुना सी.एल.-३ धारण करणारा अनुज्ञप्तीधारक, ‘ क ’ वर्ग नगरपालिका क्षेत्रात तसेच जिल्हा परिषद अधिनस्थ (कॅन्टोनमेंट क्षेत्र वगळून) कार्यक्षेत्रात असल्यास सकाळी ८-०० ते रात्री १०-०० या कालावधी व्यतिरिक्त तर उर्वरित ठिकाणी सकाळी ८-०० ते रात्री ११-०० या कालावधी व्यतिरिक्त देशी मद्य विक्री करणार नाही. ”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**युवराज ब. अजेटराव,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 20th May 2022.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. CLR-0322/C.R. 61/EXC-3.—Whereas, the Government of Maharashtra considers that the following rules further to amend the Maharshtra Country Liquor Rules, 1973 should be brought into force at once and therefore, the rules should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act (XXV of 1949) ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-clause (*iv*) of clause (*h1*) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules futher to amend the Maharashtra Country Liquor Rules, 1973 as follows, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Country Liquor (Second Amendment) Rules, 2022.

2. In rule 35 of the Maharashtra Country Liquor Rules, 1973 for sub-rule (*1*), the following sub-rule shall be substituted namely :—

> " (*1*) A licensee holding licence in Form C.L.-III, shall not sell country liquor, except during the hours from 8-00 a.m. to 10-00 p.m. in ' C ' Class Municipal areas and in areas within the limits of *Zilla Parishads* (excluding cantonment areas) and from 8-00 a.m. to 11-00 p.m. in all other remaining areas. ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

YUVRAJ B. AJETRAO,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.